


महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अंक...
साप्ताहिक
RNI : MAH/MAR/2011/40762
पोस्टल नंबर : MCW/354/2021-23

# धगधगती मुंबई

website:www.dhagdhagtimumbai.in
E-mail : dhagdhagtimumbai@gmail.com

वर्ष : १६ अंक : ३५, संपादक - भिमराव हिंदुराव धुळप, मंगळवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२६ ते १९ ऑक्टोबर २०२६ पाने : ४ मूल्य : २ रुपये

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान 2.0 चे देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन; अडाचीवाडी ग्रामपंचायतीला प्रथम क्रमांक

**नाशिक :** ग्रामीण भागाचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे काम करावे. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी गावागावांत जलसंधारणाची कामे हाती घेऊन पाण्याचा प्रत्येक थेंब अडवून जमिनीत जिरवावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. त्यांच्या हस्ते मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अभियानाच्या पहिल्या पर्वातील पुरस्कारांचे वितरणही करण्यात आले.

ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्या वतीने नाशिक येथील यूथ फेस्टिव्हल मैदानावर आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यासह विविध मान्यवर आणि राज्यभरातील सरपंच उपस्थित होते.



**पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचा गौरव**

अभियान २०२५-२६ अंतर्गत ग्रामपंचायत गटात पुणे जिल्ह्यातील अडाचीवाडी (ता. पुरंदर) ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक पटकावला. खामशेत (ता. गुहागर, जि. रत्नागिरी) आणि लाडूद (ता. बागलाण, जि. नाशिक) यांनी विभागून द्वितीय क्रमांक मिळविला. उटी बु. (ता. औसा, जि. लातूर) आणि कोतवालबर्डी (जि. नागपूर) यांनी विभागून तृतीय क्रमांक पटकावला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

मुख्यमंत्री म्हणाले, दुष्काळावर मात करण्यासाठी तलावांतील गाळ काढणे, बंधाऱ्यांची दुरुस्ती, जलसंधारण आणि पाण्याचे योग्य नियोजन आवश्यक आहे. या कामांसाठी शासन आवश्यक निधी उपलब्ध करून देईल. संकटाच्या काळात शासन शेतकरी व कष्टकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी पहिल्या टप्प्यात ५ हजार ६४४ ग्रामपंचायती सहभागी झाल्याची माहिती दिली. दुसऱ्या टप्प्यात सुमारे २८ हजार ग्रामपंचायतींनी सक्रिय सहभाग नोंदवून गावांच्या विकासाला गती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

## ‘२७ डिसेंबरला ‘नवी मुंबई महापौर मॅरेथॉन

नवी मुंबई : स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी शहराचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी रविवार, २७ डिसेंबर २०२६ रोजी ‘नवी मुंबई महापौर मॅरेथॉन’चे भव्य आयोजन करण्यात येणार आहे. नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी ही घोषणा केली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्रीडा, सांस्कृतिक कार्य व युवक कल्याण समितीच्या वतीने या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात येत आहे. नवी मुंबईचा ‘क्वीन नेकलेस’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाम बीच मार्गावर ही मॅरेथॉन होणार आहे. या स्पर्धेत १० हजारांहून अधिक धावपटू सहभागी होतील, असा विश्वास महापौरांनी व्यक्त केला.

नागरिकांमध्ये आरोग्य, शारीरिक तंदुरुस्ती, स्वच्छता तसेच पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. शहरातील नियमित धावपटूंसह सर्व नागरिकांना या मॅरेथॉनच्या माध्यमातून सहभागाची संधी मिळणार आहे.

मॅरेथॉनसाठी लवकरच नावनोंदणी सुरू करण्यात येणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन नवी मुंबईच्या एकात्मतेला बळ द्यावे, असे आवाहन महापौर सुजाता पाटील यांनी केले आहे.



## दुष्काळग्रस्तांना दिलासा देण्यासाठी रोजगार, पाणी, अन्नसुरक्षा आणि चारा नियोजनावर भर; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची केंद्रीय पथकासोबत बैठक

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी केंद्रीय पथकासोबत बैठक झाली. दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना पुढील सहा ते आठ महिने आधार देण्यासाठी रोजगारनिर्मिती, अन्नसुरक्षा, पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी चारा-पाण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

केंद्रीय पथकांनी अहिल्यानगर, सोलापूर, जालना, बीड, धाराशिव, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त गावांची पाहणी करून शेती, जलस्रोत आणि शेतकऱ्यांच्या समस्यांची माहिती घेतली. या पथकाचा अहवाल केंद्र सरकारला सादर झाल्यानंतर मदतीच्या प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा आहे.



मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, पावसातील दीर्घ खंडामुळे सोयाबीन, कापूस, तूर आणि ऊस पिकांचे नुकसान झाले आहे. रब्बी हंगामावरही परिणाम होण्याची शक्यता असल्याने रोजगार व अन्नधान्य पुरवठ्याच्या योजनांद्वारे मदत केली जाईल.

**पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य**

ग्रामीण भागातील आटलेल्या जलस्रोतांमुळे आवश्यक ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जाणार आहे. उपलब्ध पाण्याचे पहिले आरक्षण ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्यासाठी करण्यात आले असून नागरिक आणि पशुधनाच्या गरजांना प्राधान्य दिले जाणार आहे.

जलसाठ्यांतील गाळ काढणे, जलसंधारण संरचनांची दुरुस्ती आणि पुनरुज्जीवनाची कामेही हाती घेण्यात येणार आहेत. पशुधनासाठी चारा साठवणूक, चारा छावण्या आणि आवश्यकतेनुसार अन्य राज्यांतून चारा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे.

यावेळी मंत्री गिरीश महाजन, दत्तात्रय भरणे, मकरंद जाधव-पाटील तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



**जगप्रसिद्ध माईंची माऊली, कोपरखैरणे (नवी मुंबई) येथे नवरात्रोत्सवानिमित्त भक्तांचे श्रद्धास्थान!**

**श्री. हरीश पाटील, विराज पाटील आणि डॉ. श्री. प्रेमल बा. म्हात्रे यांच्याकडून सर्व भक्तांचे सहर्ष स्वागत!**

## मुंबईतील रखडलेल्या एसआरए प्रकल्पांचे होणार ऑडिट; प्रकल्पांना गती देण्यासाठी तज्ज्ञ समितीची स्थापना; माजी खासदार राहुल शेवाळे यांचा समावेश



**“विविध कारणांमुळे मुंबईतील अनेक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प खूप वर्षांपासून रखडले आहेत. अनेक झोपू योजनांमध्ये कायदेशीर पेच निर्माण झाले आहेत. यामुळे तिथल्या रहिवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. एसआरए प्रकल्प रखडल्याने हवालदिल झालेल्या मुंबईतल्या शेकडो कुटुंबांना त्यांच्या हक्काचे घर मिळवून देण्यासाठी आणि त्यांना सन्मानपूर्वक आयुष्य जगण्याची संधी देण्यासाठी आम्ही समितीच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न करू. रखडलेल्या प्रकल्पांमुळे त्रस्त असलेल्या कुटुंबांना शिवसेना – भाजप महायुतीचे सरकार वाऱ्यावर सोडणार नाही”**

**– राहुल रमेश शेवाळे, माजी खासदार**

**मुंबई :** मुंबईतील रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना गती देणे, कायदेशीर पेच सोडविणे आणि झोपडपट्टीधारकांना हक्काची घरे मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे. या समितीच्या माध्यमातून रखडलेल्या एसआरए प्रकल्पांचे परीक्षण करून आवश्यक उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत. गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या या समितीत शिवसेनेचे सरचिटणीस तथा माजी खासदार राहुल शेवाळे, आमदार पराग अळवणी, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नगररचना विभागाचे संचालक, मुंबई महापालिकेच्या विकास नियोजन विभागाचे प्रमुख अभियंता तसेच वास्तुविशारदांचा समावेश आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमधील विलंब आणि कायदेशीर अडचणींमुळे अनेक कुटुंबांना वर्षानुवर्षे हक्काच्या घराची प्रतीक्षा करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशांचा अभ्यास करून समिती शासनाला शिफारसी करणार आहे. येत्या दहा महिन्यांत प्राथमिक अहवाल सादर करण्याचे नियोजन आहे.

## संपादकीय

# महाराष्ट्रावर पाणीटंचाईचे संकट....

ग्रामीण भागात पाण्यासाठी वणवण, शेतपिके जळाली; मुंबई, नवी मुंबई आणि ठाण्याच्या पाणीपुरवठ्याचेही योग्य नियोजन आवश्यक

महाराष्ट्रात पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असून, ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक ठिकाणी पावसाचे अनियमित प्रमाण, भूजलपातळीत होणारी घट, जलस्रोतांचे दुर्लक्ष आणि पाण्याच्या वाढत्या वापरामुळे परिस्थिती चिंताजनक बनत आहे. पाण्याअभावी शेतातील पिके जळून जाणे, जनावरांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होणे आणि टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ येणे, ही ग्रामीण महाराष्ट्राची वेदनादायी वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकारने तातडीच्या उपाययोजनांसोबतच दीर्घकालीन जलव्यवस्थापनाचे धोरण राबविणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील पाणीप्रश्नाबरोबरच मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि त्यांच्या उपनगरांतील वाढती लोकसंख्या, झपाट्याने सुरू असलेली बांधकामे आणि पाण्याची वाढती मागणी यांचाही गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. धरणांमधून मिळणारे पाणी मर्यादित असताना त्याचा वापर काटकसरीने आणि प्राधान्यक्रमाने होणे गरजेचे आहे. नागरिकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळणे, ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असली पाहिजे.

मुंबई आणि परिसरातील जुन्या विहिरी, विहिरींचे अवशेष, तसेच ऐतिहासिक बावड्या आणि पारंपरिक जलस्रोत यांचा शोध घेऊन त्यांची नोंदणी करण्याची मोहीम हाती घ्यावी. महानगरपालिका, नगरपरिषदा आणि संबंधित विभागांनी अशा जलस्रोतांचे सर्वेक्षण करून त्यांची सद्यस्थिती तपासावी. जे जलस्रोत पुनरुज्जीवित करणे शक्य आहे, त्यांची स्वच्छता, दुरुस्ती, गाळ काढणे आणि पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था करावी. भूजलाची गुणवत्ता आणि सुरक्षितता तपासल्यानंतरच त्याचा पिण्यासाठी किंवा अन्य वापरासाठी उपयोग करावा. यामुळे मुख्य जलपुरवठ्यावरील ताण काही प्रमाणात कमी होऊ शकतो.

दुसरीकडे, पाणीटंचाईच्या काळात पाण्याच्या वापरावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. खासगी वाहनांची पिण्याच्या पाण्याने धुलाई, स्विमिंग पूलमधील पाण्याचा अनावश्यक वापर आणि बागांसाठी गोड्या पाण्याचा अतिवापर यावर निर्बंध घालावेत. शक्य असेल तेथे प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करावा. बांधकामांसाठीही पिण्याच्या पाण्याऐवजी पुनर्प्रक्रिया केलेले पाणी किंवा नियमांनुसार उपलब्ध पर्यायी जलस्रोत वापरणे बंधनकारक करण्याचा विचार करावा. मात्र, सर्व बांधकामे सरसकट थांबविण्याऐवजी पाणीवापराचे नियम, उपलब्ध साठा आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन टप्प्याटप्प्याने निर्बंध लागू करावेत. नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असेल, तर संबंधित प्रकल्पांवर तातडीने नियंत्रण ठेवावे.

ज्या धरणे आणि तलावांमधून शहरांना पाणीपुरवठा होतो, त्या जलसाठ्यांचे नियोजन पारदर्शक असावे. उपलब्ध पाणीसाठा, अपेक्षित मागणी आणि संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य द्यावे. पाणीगळती रोखणे, अनधिकृत जोडण्या शोधणे, पावसाचे पाणी साठविणे, छतावरील जलसंधारण सक्तीने राबविणे आणि सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर वाढविणे, या उपाययोजनांना गती देणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांसाठी शेततळी, बंधारे, नाला खोलीकरण, जलयुक्त शिवाराची कामे आणि ठिबक सिंचनासारख्या पाणीबचत तंत्रांना प्रोत्साहन द्यावे. दुष्काळग्रस्त भागांत पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि आवश्यक मदत वेळेत पोहोचवावी.

पाणी हा केवळ नैसर्गिक स्रोत नसून जीवनाचा मूलभूत आधार आहे. आज पाण्याचा अपव्यय रोखला नाही, तर उद्या त्याची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागेल. म्हणूनच राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, बांधकाम व्यावसायिक आणि नागरिक यांनी एकत्रितपणे जबाबदारी स्वीकारली पाहिजे. जुन्या जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, पाण्याचा काटकसरीने वापर आणि कठोर पण न्याय्य नियमांची अंमलबजावणी यांमधूनच महाराष्ट्राला पाणीटंचाईच्या संकटातून बाहेर काढण्याचा मार्ग सापडू शकतो.

आजच जागे होऊया; कारण पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे म्हणजे उद्याचे जीवन सुरक्षित करणे होय!

# दिल्लीप्रमाणेच ऑगस्ट क्रांती मैदानालाही छावणीचे स्वरूप

मुंबई : (जमीर काझी) : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी शनिवारी मुंबईतील ऐतिहासिक ऑगस्ट क्रांती मैदानावर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी, अभिनेता इमरान खान यांच्यासह ६५० हून अधिक जणांना पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईअंतर्गत ताब्यात घेतले.



तुषार गांधी यांच्या 'सिटिझन्स फॉर पीस' या संस्थेच्या वतीने शांततापूर्ण आंदोलनाचे आवाहन करण्यात आले होते. मात्र, पोलिसांनी सकाळपासूनच मैदानाकडे जाणारे रस्ते बॅरिकेड्स लावून बंद केले. राज्य राखीव पोलीस दल, दंगल नियंत्रण पथक आणि स्थानिक पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आल्याने परिसराला छावणीचे स्वरूप आले होते.

वांद्रे येथून आंदोलनासाठी निघालेल्या तुषार गांधी यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांना सोडविण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांनी डी. एन. नगर पोलीस ठाण्यात ठिय्या दिला. त्यानंतर तुषार गांधी यांची सुटका करण्यात आली.

दरम्यान, मैदानावर जमलेल्या आंदोलकांनी मुख्य निवडणूक आयुक्त, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. पुण्यातील लाल महाल परिसरातही आंदोलनकर्त्यांवर कारवाई करण्यात आली. मुंबईतील रस्ते बंद केल्याने काही मार्गांवरील वाहतूक वळविण्यात आली होती.

# दादर पश्चिमेतील अधिकृत फेरीवाल्यांना पुन्हा व्यवसायाची मुभा

# हॉकर्स संघटनेच्या पाठपुराव्याला यश

मुंबई : दादर पश्चिम विभागातील दुकानदार आणि अधिकृत फेरीवाल्यांमध्ये विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. दादर व्यापारी असोसिएशन तसेच महाराष्ट्र हॉकर्स संघ, संलग्न भारतीय मजदूर संघ यांच्या समन्वयातून जी-उत्तर विभागातील गेल्या आठ ते नऊ महिन्यांपासून बंद असलेल्या अधिकृत फेरीवाल्यांचा व्यवसाय पुन्हा सुरळीत सुरू करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला.



न्यायालयाच्या आदेशांचा अभ्यास करून आणि कायद्याच्या चौकटीत राहून संघटनेने वकिलांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई महापालिकेच्या जी-उत्तर विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेश देसाई, पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ महेंद्र पंडित तसेच दादर, शिवाजी पार्क, माहीम, शाहूनगर आणि धारावी पोलीस ठाण्यांशी चर्चा केली.

या चर्चेच्या अनुषंगाने महापालिकेने अधिकृत व कोडधारक फेरीवाल्यांची यादी संबंधित पोलीस विभागाला देऊन, नियम व कायद्याच्या चौकटीत राहून त्यांना व्यवसाय करण्यास सहकार्य करण्याबाबत सूचना दिल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

जी-उत्तर विभागातील सुमारे ७५ टक्के लढा संघटनेने यशस्वीपणे लढविला असून, त्यामुळे हजारो कुटुंबांना रोजगार मिळण्यास मदत झाली, असा दावा पदाधिकाऱ्यांनी केला.

दरम्यान, मुंबईतील सर्व फेरीवाल्यांनी संघटनेत सहभागी व्हावे. फेरीवाल्यांवर होणारा अन्याय किंवा अडचणी संघटनेच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटना कायदेशीर मार्गाने पाठपुरावा करेल, असे आवाहन महाराष्ट्र हॉकर्स संघाच्या वतीने करण्यात आले.

# 'आम्ही सातारकर' विकास प्रतिष्ठानतर्फे 17 ऑक्टोबरला दसरा मेळावा व विद्यार्थी गुणगौरव सोहळा

मुंबई : 'आम्ही सातारकर' विकास प्रतिष्ठानच्या वतीने शनिवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर पूर्व येथे दसरा मेळावा व विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यात मुंबई, नवी मुंबई व ठाणे परिसरातील सातारावासीय गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात येणार आहे. दहावी, बारावी, पदवी, पदविका, पदव्युत्तर तसेच इतर शैक्षणिक विभागांतील प्रत्येक विभागाच्या प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील साक्षांकित गुणपत्रिका विद्यार्थ्यांनी पालकांसह १४ ऑक्टोबर २०२६ पर्यंत संस्थेकडे जमा करावयात. गुणपत्रिकेसोबत विद्यार्थ्यांचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, मूळ गाव व तालुका यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

गुणपत्रिका संस्थेच्या न्यू सातारा पतसंस्था बी -१ प्रोग्रेसिव्ह बिल्डिंग, डॉ. कंपाऊड, चिंचपोकळी पूर्व येथील कार्यालयात किंवा ई-मेलद्वारे aamhisatarkar25@gmail.com / amhisatarkar12@gmail.com पाठवाव्यात, असे आवाहन प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे.

# दोन दिग्गज कलाकार काळाच्या पडद्याआड; मराठी कलाविश्वावर शोककळा





मुंबई : मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आणि ज्येष्ठ अभिनेत्री व लावणी कलावंत मधू कांबीकर यांच्या निधनाने मनोरंजनविश्वावर शोककळा पसरली आहे. आपल्या दमदार अभिनयाने आणि वैशिष्ट्यपूर्ण कलाविष्काराने या दोन्ही कलाकारांनी रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले होते.

नाना पाटेकर यांचे ८ ऑक्टोबर रोजी गोव्यात वयाच्या ७५व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. 'क्रांतिवीर', 'परिंदा', 'नटसम्राट' आणि 'वेलकम' यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसह पद्मश्री सन्मानाने गौरविण्यात आलेल्या नाना यांनी 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठीही सामाजिक कार्य केले. त्यांच्या निधनाने अभिनय आणि समाजसेवेतील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व हरपले आहे.

ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांचे १२ ऑक्टोबर रोजी पुण्यात वयाच्या ७३व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाल्याचे वृत्त आहे. चार दशकांहून अधिक काळ त्यांनी मराठी चित्रपट, नाटक, दूरदर्शन आणि लोककलेच्या क्षेत्रात योगदान दिले. 'एक होता विदूषक', 'हेच माझं माहेर' आणि 'शापित' यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका तसेच लावणी सादरीकरण रसिकांच्या स्मरणात राहील.

या दोन्ही कलाकारांच्या निधनाने मराठी सांस्कृतिक विश्वाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या कलाकृती आणि आठवणी रसिकांच्या मनात सदैव जिवंत राहतील. भावपूर्ण श्रद्धांजली!

# शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठानचा द्वितीय वर्धापन दिन उत्साहात

## शरद पवार यांच्या हस्ते रामशेठ ठाकूर यांना जीवनगौरव; संजूबाबा गायकवाड यांना 'शरद रत्न' पुरस्कार






मुंबई : शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य सोहळा रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी-दादर येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात रायगडचे भाग्यविधाते लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रतिभाताई पवार यांचीही आवर्जून उपस्थिती होती.

महाबळेश्वरचे सुपुत्र संजूबाबा गायकवाड यांना 'शरद रत्न' पुरस्काराने शरद पवार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना 'शरद रत्न' तसेच 'कला गौरव' पुरस्कार प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

सोहळ्याची सुरुवात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, दादर पश्चिम येथून निघालेल्या भव्य दिंडी सोहळ्याने झाली. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील विविध कलावंतांनी पारंपरिक वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला. दिंडीदरम्यान सादर झालेली विविध कला, पारंपरिक वाद्ये, वेशभूषा आणि रिंगण सोहळा उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरला. डोळ्यांचे पारणे फेडणारा हा दिमाखदार दिंडी सोहळा रवींद्र नाट्य मंदिर येथे पोहोचला.

दिंडीचे स्वागत स्थानिक शिवसेना आमदार महेश सावंत यांनी केले. यावेळी माहीम विधानसभा निरीक्षक यशवंत विचले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, श्री ब्र. १०८ महंत डॉ. निळकंठ शिवाचार्य धारेश्वर महाराज, लोकमतचे पत्रकार दीपक भातुसे, श्री एच. बी. जंगम, पुण्यप्रतापचे संपादक विवेकानंद पाटील, अभिनेते अरुण कदम यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांना 'शरद रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना 'कला गौरव' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये लावणी कलावंत महासंघाचे संस्थापक अध्यक्ष संतोष लिंबोरे पाटील, 'धगधगती मुंबई'चे संपादक भीमराव बाळकाबाई हिंदुराव धुळप, डॉ. सचिन मंत्री यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश होता.

**३६ जिल्ह्यांतील कलावंतांचा वर्षभराचा विमा; अवघ्या दोन वर्षांत प्रतिष्ठानला ISO प्रमाणपत्र**

कलावंतांच्या हितासाठी शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठानने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. प्रतिष्ठानच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील कलावंतांचा एक वर्षाचा विमा उतरविण्यात आला आहे. कलावंतांच्या सुरक्षिततेचा विचार करून राबविण्यात आलेला हा उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरला. विशेष म्हणजे, प्रतिष्ठानच्या स्थापनेला अवघी दोन वर्षे पूर्ण होत असतानाच संस्थेला ISO प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. या महत्त्वपूर्ण यशाचे अनावरण राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार यांच्या हस्ते करण्यात आले. अवघ्या दोन वर्षांच्या कालावधीत संस्थेने कलावंतांच्या हितासाठी केलेले कार्य आणि उभारलेली संघटनात्मक बांधणी यामुळे हे यश प्रतिष्ठानच्या कार्याला मिळालेली महत्त्वपूर्ण पावती मानली जात आहे. यावेळी मनोगत व्यक्त करताना शरद पवार म्हणाले की, "शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठानने ३६ जिल्ह्यातील कलावंतांना एकत्रित करून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी काम करण्याचे मोठे कार्य केले आहे. संस्थापक अध्यक्ष राजाराम व. शेलार यांनी केलेले हे कार्य कौतुकास्पद असून त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. आजचा हा सोहळा निश्चितच दीर्घकाळ स्मरणात राहील."

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जीवनगौरव पुरस्कार देण्यात आल्याबद्दल आनंद व्यक्त करताना पवार म्हणाले, "कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'शिका आणि कमवा' या विचारधारेवर काम करताना रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेला दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या कार्याचा आज या ठिकाणी गौरव होत आहे, याचा मला मनस्वी आनंद आहे." कलावंतांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देणे, त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे आणि महाराष्ट्रातील विविध भागांतील कलावंतांना एका व्यासपीठावर आणण्याचे काम प्रतिष्ठानच्या माध्यमातून सुरू असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजाराम व. शेलार, उपाध्यक्ष तथा उरणच्या नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर, सचिव श्री एच. बी. जंगम, खजिनदार सुरेश पाटील तसेच सर्व कार्यकारी सदस्यांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष लिंबोरे पाटील आणि श्रुती परब यांनी केले.

# एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन स्थगित;
## तुकाराम मुंढे चौकशी समितीत सचिव म्हणून काम पाहणार

पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध मागण्यांसाठी पुण्यात गेल्या ११ दिवसांपासून सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन अखेर स्थगित करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेऊन आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले.

एमपीएससीमधील कथित गैरकारभाराच्या चौकशीसाठी तुकाराम मुंढे हे चौकशी समितीत सचिव म्हणून काम पाहतील, अशी घोषणा शिवेंद्रराजे यांनी केली. तसेच, आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. सरकारने मान्य केलेल्या मागण्यांचा मसुदाही त्यांनी आमदार रोहित पवार यांच्याकडे सुपूर्द केला.

यावेळी विद्यार्थिनींनी शिवेंद्रराजे यांच्यासमोर घोषणाबाजी केली. त्यावर प्रतिक्रिया देताना, "माझा अभ्यास कमी आहे. मी भारती विद्यापीठात शिकलो नाही, तर साताऱ्यात सामान्य परिस्थितीत शिकलो. त्यामुळे माझ्यावर टीका करू नका," असे ते म्हणाले. संविधानिक तरतुदी आणि कायदेशीर प्रक्रिया पाळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, रोहित पवार यांनी विद्यार्थ्यांच्या एकजुटीमुळे जागा वाढविण्यासह विविध मागण्या मान्य झाल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करून आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

# देवीच्या चरणी बळीराजासाठी साकडे
## शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीर – एकनाथ शिंदे

ठाणे : दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकार खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे असून केंद्र सरकारकडूनही भरीव सहकार्य मिळेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. नवरात्रोत्सव मंडळांनी उत्सवातील बचतीतून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. टेंभी नाका येथील श्री जय अंबे माँ सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाच्या आई दुर्गेश्वरीचा आगमन सोहळा घटस्थापनेच्या दिवशी मोठ्या उत्साहात पार पडला. ढोल-ताशे, लेझीम, कोळी नृत्य, गोंधळ आणि आदिवासी तारपा नृत्य अशा पारंपरिक कलाप्रकारांनी सजलेल्या मिरवणुकीनंतर देवीची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

यावेळी शिंदे म्हणाले की, दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी केंद्राचे पथक आले असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशीही चर्चा झाली आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आवश्यक सवलती, नुकसानभरपाई आणि मदत देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शेतकरी कुटुंबांतील मुलींच्या विवाहासाठी तसेच महिलांना सायकली आणि शिलाई मशीन वाटपासाठीही उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या टेंभी नाका नवरात्रोत्सवाचे हे ४८वे वर्ष आहे. यंदा श्री बद्रीनाथ मंदिराची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. यावेळी खासदार नरेश म्हस्के, आमदार रवींद्र फाटक, पोलीस आयुक्त आशुतोष डुमरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



कोपरखैरणे येथील एकता वेल्फेअर असोसिएशनचा नवरात्रोत्सव!



शास्त्रीनगर सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ धारावी अध्यक्ष संतोष पोटे



नवजीवन मित्र मंडळ,धारावी



खांबदेव उत्कर्ष नवरात्रोत्सव मंडळ,धारावी नवसाला पावणारी धारावीची कुलस्वामिनी

# धारावीतील दोन सुपुत्रांचा 'कला गौरव' पुरस्काराने सन्मान



मुंबई : शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरात शरद रत्न व कला गौरव पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात कला, सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यामध्ये धारावीचे सुपुत्र तथा 'धगधगती मुंबई' वृत्तपत्राचे संपादक भीमराव धुळप आणि लावणी कलावंत महासंघाचे संस्थापक अध्यक्ष संतोष लिंबोरे पाटील यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'कला गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजाराम बुवा शेलार, उपाध्यक्ष भावनाताई घाणेकर आणि सचिव एच. बी. जंगम यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

धारावीतील या दोन्ही सुपुत्रांनी आपापल्या क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना मिळालेल्या या सन्मानामुळे धारावी परिसरात आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'नवरात्रीचे नऊ रंग' पुस्तकाचे कळंबोलीत उत्साहात प्रकाशन



कळंबोली : शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कळंबोली येथील कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी माता मंदिरात डॉ. गोरखनाथ पोळ व अंजना महादेव पोळ लिखित 'नवरात्रीचे नऊ रंग' या पुस्तकाचे प्रकाशन भक्तिमय वातावरणात करण्यात आले.

नवरात्र नऊ दिवसच का साजरे केले जाते, देवीची नऊ रूपे, नवरात्राचे महत्त्व, आरत्या, पूजनपद्धती तसेच विजयादशमी आणि आपट्याची पाने सोने म्हणून वाटण्यामागील परंपरा यांची माहिती या पुस्तकातून सोप्या व रंजक भाषेत देण्यात आली आहे. भारतीय संस्कृती आणि धार्मिक परंपरांची ओळख नव्या पिढीला करून देणे हा या पुस्तकाचा मुख्य उद्देश आहे.

आप्पासो (नाना) खलाटे, जयश्री खलाटे व मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी अध्यक्ष अमित पोटे, मंगेश गायकर, खजिनदार अविनाश अब्दगीर, सचिव गणेश शिंदे, रामदास पोळ, स्वाती पोळ, मानसी पोळ, जहागीरदार सर, संदीप खलाटे आदी उपस्थित होते.

लेखक डॉ. गोरखनाथ पोळ यांनी हे पुस्तक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून भारतीय संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी सामाजिक व नवरात्रोत्सव मंडळांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

# दादर ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ एसटी बससेवा सुरू




मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने दादर ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळादरम्यान ई-शिवाई बससेवा सुरू करण्यात आली आहे. अटल सेतूमार्गे धावणाऱ्या या बससेवेचा प्रारंभ परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला.

नवी मुंबई विमानतळाला मुंबईसह राज्यातील विविध भागांशी जोडण्याच्या दृष्टीने ही सेवा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. दादर हे मुंबईतील प्रमुख वाहतूक केंद्र असल्याने विमानप्रवाशांना थेट विमानतळापर्यंत पोहोचणे अधिक सोयीचे होणार आहे. सुरक्षित, विश्वासार्ह आणि माफक खर्चातील प्रवासाची सुविधा यामुळे उपलब्ध होईल.

दरम्यान, बोरिवली आणि पुण्यातील स्वारगेट येथूनही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी बससेवा सुरू करण्यात येत असून, त्यामुळे विमानतळाची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

# महाराष्ट्राची लेक स्मृती मानधना भारतीय महिला क्रिकेट संघाची नवी कर्णधार




मुंबई : महाराष्ट्राची लाडकी लेक आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आघाडीची फलंदाज स्मृती मानधना हिची ६ ऑक्टोबर २०२६ रोजी भारतीय महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ही घोषणा केली.

१८ जुलै १९९६ रोजी मुंबईत जन्मलेल्या स्मृतीचे क्रिकेटमधील सुरुवातीचे प्रशिक्षण सांगली येथे झाले. डावखुरी फलंदाज असलेल्या स्मृतीने २०१३ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. सातत्यपूर्ण कामगिरी आणि आक्रमक फलंदाजीच्या जोरावर तिने जागतिक क्रिकेटमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले.

सप्टेंबर २०२६ मध्ये हाँगकाँगविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात तिने अवघ्या ६४ चेंडूंत १२४ धावांची विक्रमी खेळी केली. याच कामगिरीसह तिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०,८८० धावा आणि १८ शतके पूर्ण करत मिताली राजचा धावांचा विक्रमही मागे टाकला.

महिला प्रीमियर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे नेतृत्व करताना स्मृतीने २०२४ आणि २०२६ मध्ये संघाला विजेतेपद मिळवून दिले. आता भारतीय संघाचे नेतृत्व करताना फलंदाजीतील सातत्य, संघातील एकजूट आणि आगामी स्पर्धांतील यश मिळवण्याचे आव्हान तिच्यासमोर असेल.

महाराष्ट्राच्या या गुणी लेकीच्या यशामुळे राज्यातील क्रिकेटप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बेंगळुरूच्या 'निखिल प्रॉडक्ट्स'ची गुग्गुळ धूपकांडी बाजारात दाखल

**मुंबई** : बेंगळुरू येथील निखिल प्रॉडक्ट्स कंपनीने दसरा आणि दिवाळी या सणांच्या पार्श्वभूमीवर गुग्गुळ धूपकांडी बाजारात उपलब्ध करून दिली आहे. उच्च दर्जाच्या नैसर्गिक सुगंधी द्रव्यांपासून तयार करण्यात आलेल्या या धूपकांड्यांना सणासुदीच्या काळात ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी बाजारात आणण्यात आले आहे.

भारतीय संस्कृतीत पूजा-अर्चा आणि धार्मिक विधींमध्ये धूपाला विशेष महत्त्व आहे. धूपाच्या सुगंधामुळे पूजेच्या वातावरणात प्रसन्नता निर्माण होते आणि मन एकाग्र करण्यास मदत होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. याच पार्श्वभूमीवर निखिल प्रॉडक्ट्सने गुग्गुळ धूपकांडी ग्राहकांसाठी उपलब्ध केली आहे.

या धूपकांड्यांचे एका पॅकमध्ये १८ कांड्यांचे पॅकिंग असून, त्याची कमाल किरकोळ किंमत (MRP) १०५ रुपये आहे. मुंबई, ठाणे, कोकण, पुणे, कोल्हापूर, नाशिक, बीड यांसह संपूर्ण महाराष्ट्रात हे उत्पादन उपलब्ध असल्याची माहिती कंपनीच्या वतीने देण्यात आली आहे.

## मुंबईतील प्रमुख विक्री केंद्रे

निखिल प्रॉडक्ट्सच्या उत्पादनांचे मुंबईतील प्रमुख विक्रेते आचार्य प्रॉडक्ट्स यांच्या खालील शाखांमध्ये गुग्गुळ धूपकांडी उपलब्ध आहे.

१. माटुंगा (पूर्व) – शॉप नं. ५ ते ८, संगीत सागर, एल. एन. लेन, मुंबई – १९. संपर्क : ८६५५७६६७७८.

२. भुलेश्वर – शॉप नं. ३, श्रीपती आराधना टॉवर, राममंदिराच्या पुढे, मुंबई – २. संपर्क : ९७६९०७८३६५.

३. मालाड (पश्चिम) – शॉप नं. १९-ए, नटराज मार्केट, स्टेशन रोड, मुंबई – ६४. संपर्क : ७५०६८१६२७२.

४. ठाणे (पश्चिम) – शॉप नं. ३-४, हॉटेल प्रिन्स, अशोक टॉकीजशेजारी, स्टेशन रोड, ठाणे – ४००६०१. संपर्क : ९१६७६५८७६८.

५. वाशी – शॉप नं. १, मर्चंट सेंटर, ए.पी.एम.सी. मार्केट, सेक्टर १९, वाशी – ४००७०३. संपर्क : ८८७९३७४५९२.

सणासुदीच्या काळात पूजेसाठी सुगंधी धूपकांडी शोधणाऱ्या ग्राहकांसाठी हे उत्पादन उपलब्ध झाले असून, दिलेल्या विक्री केंद्रांवर संपर्क साधून ग्राहकांना अधिक माहिती मिळवता येईल.



**श्री संत रोहीदास नवरात्री उत्सव मंडळ.**
**संत रोहिदास नगर, तुरूकवाडी.**

Printed and published by Bhimrao Hindurao Dhulap, Printed at PRACHITA PRINT E/103 AMIT APARTMENT AKANSHA COMPLEX LAXMIBEN CHEDA ROAD NILEMORE. NALLASOPRA (W), PALGHAR, MAHARASHTRA-40103. and published at C/66, Mukund Nagar, A-Ward, Laxmi Mandir, Dharavi, Mumbai -400 017.
**Editor: Bhimrao Hindurao Dhulap,** Mob. 9221117684 (Any litigation against the content will be entertained under the jurisdiction of Mumbai only. )

हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक श्री. भिमराव हिंदुराव धुळप यांनी प्रचिता प्रिंट इ/१०३ अमित अपार्टमेंट, आकांक्षा कॉम्प्लेक्स, लक्ष्मीबेन छेडा रोड, नीलमोर नालासोपारा ( पश्चिम) पालघर, महाराष्ट्र ४०१२०३ येथून छापून सी/६६ मुकुंदनगर, ए/ वॉर्ड, लक्ष्मी मंदिर, धारावी, मुंबई ४०००१७ येथून प्रकाशित केले.
**संपादक:भिमराव हिंदुराव धुळप.** मो. ९२२१११७६८४ (प्रकाशित बातम्या / लेखांशी सहमत असतीलच असे नाही सर्व वाद मंबर्ज न्यायकक्षेत)